दै. प्रजावाणी दि. 12/09/24

राशनचा काळाबाजार ● आपरेशन फ्लॅश आऊटनुसार तिसरी कारवाई

# काळ्या बाजारात जाणारे धान्य पोलिसांकडून जप्त

वार्ताहर ● देगलूर

पोलीस अधीक्षक अबिनाशकुमार यांनी सुरु केलेल्या आपरेशन फ्लॅश आऊटनुसार अवैध धंद्यांवर आळा बसविला जातो आहे. याअंतर्गत मंगळवारी (दि.१०) जिल्ह्यामध्ये तिसरी कारवाई करत काळ्या बाजारात जाणारे एक लाख २० हजार रुपयांचे राशनचे धान्य जप्त करून गुन्हा दाखल केला आहे. यापूर्वी कृष्णूर आणि अर्धापूर येथे कारवाई झालेली आहे.

देगलूर पोलीस ठाण्याचे पथक मंगळवारी देगलूर हद्दीमध्ये पेट्रोलिंग करत होते. यावेळी त्यांना गुप्त बातमीदारामार्फत राशनचे धान्य काळ्या बाजारात जात असल्याची माहिती मिळाली. त्यानुसार देगलूर ते उदगीर रोडवर मौजे कारेगाव येथे सदर पथकाने सापळा रचला. काही वेळातच आयशर (एमएच-२६, बीडी-८०५१) येत असताना त्याला थांबविले. त्यानंतर वाहनाची तपासणी केली असता त्यात गहू व तांदळाचे ११५ कट्टे (किंमत एक लाख २० हजार) राशनचा माल आढळून आला.

सदर आयशर व त्यातील माल जप्त करून ट्रकचालकास ताब्यात घेतले आहे. ही कारवाई सपोनी व्ही. एस. आरसेवार, पोतदार, मुंढकर, तलवारे, येंगाले, वाघमारे आदींनी केली.



## गरीबांच्या धान्यावर डल्ला

शासनाने गरीबांना स्वस्तामध्ये राशनचे धान्य मिळावे, यासाठी राशन दुकानामधून तांदूळ, गहूसह इतर वस्तू स्वस्तामध्ये दिले जात आहे. मात्र, त्यातही डल्ला मारला जात आहे. प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे असे प्रकार घडत असून, यामध्ये प्रशासनातील अधिकाऱ्यांचाही समावेश असून, याची कसून चौकशी करून त्यांच्यावर कारवाई करावी. जेणे करून असे प्रकार यापुढे होणार नाही.

---

दै. लोकमत

# गहू अन् तांदळाचा ट्रक पकडला



लोकमत न्यूज नेटवर्क

**नांदेड :** जिल्ह्यात अवैध धंद्यांच्या विरोधात पोलिसांचे ऑपरेशन फ्लश आऊट सुरु असून, त्या अंतर्गत १० सप्टेंबर रोजी देगलूर ते उदगीर रस्त्यावर गहू अन् तांदळाने भरलेला ट्रक पोलिसांनी पकडला. या ट्रकमधील धान्य रेशनचे असल्याचा अंदाज आहे. त्या दृष्टीने आता तपासणी करण्यात येत आहे. विशेष म्हणजे काही दिवसांपूर्वीच रेशनचा माल काळाबाजारात विक्रीसाठी जात असताना अर्धापूर पोलिसांनी कारवाई केली होती.

कृष्णूर धान्य घोटाळ्यानंतरही नांदेड जिल्ह्यात रेशनच्या काळाबाजाराला ब्रेक लागला नाही. जुनेच गडी नवे खिलाडी सोबत घेऊन पुन्हा जोमाने कामाला लागले आहेत. काही दिवसांपूर्वीच अर्धापूर पोलिस ठाण्याच्या हद्दीत रेशनचा ट्रक पकडल्यानंतर कपिल पोकर्णा याच्यासह अन्य दोघांवर गुन्हा नोंद झाला होता. आता १० सप्टेंबर रोजी पोलिस अधीक्षक यांच्या विशेष पथकाने देगलूर ते उदगीर रस्त्यावर मौजे कारेगाव येथे एम.एच.२६ बीडी.८०५१ या क्रमांकाचे आयशर वाहन पकडले. या वाहनात गहू आणि तांदळाची ११५ पोती होती. याबाबत ट्रक चालकाला चौकशीत समाधानकारक उत्तरे देता आली नाहीत. त्यामुळे आयशर वाहन जप्त करण्यात आले आहे. याबाबत पुरवठा विभागाचा अहवाल मागविण्यात आला आहे.